**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात सुमारे ३४ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचे १७ सामंजस्य करार, ३३ हजारापेक्षा जास्त रोजगारनिर्मिती होणार

- ऊर्जा कार्यक्षमता निर्देशांकांमध्ये महाराष्ट्र देशात अग्रस्थानी

- मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांचं आझाद मैदानात उपोषण सुरु, मुंबईत अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी, आंदोलनाला मुदतवाढ

- जालना जिल्ह्यात गाडी विहिरीत कोसळून ५ जणांचा मृत्यू

**आणि**

- राज्यात अनेक ठिकाणी पावसाचा जोर कायम, १० जिल्ह्यांना उद्यासाठी ऑरेंज अलर्ट

**<><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत आज १७ सामंजस्य करार करण्यात आले. या करारांमधून एकूण ३३ हजार ७६८ कोटी ८९ लाख रुपयांची गुंतवणूक राज्यात यणार असून ३३ हजारापेक्षा जास्त रोजगारनिर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

या गुंतवणुकीत इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, सोलार, इलेक्ट्रिक बसेस आणि ट्रक्स, तसंच संरक्षण आणि संबंधित विविध क्षेत्रांचा समावेश आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्र, पुणे, विदर्भ, कोकण अशा सर्वच भागांमध्ये उद्योग उभारणीची संधी उपलब्ध होणार आहे. गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात सहज आणि सुरळीत अनुभव मिळावा यासाठी सरकार वचनबद्ध आहे. आम्ही फक्त करारावर स्वाक्षरी करून  थांबणार नाही, तर गुंतवणुकीच्या प्रत्येक टप्प्यावर राज्य शासन भागीदार म्हणून सोबत राहील. याबाबत कुठंही अडथळा येणार नाही, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><>**

महाराष्ट्र हे देशात ऊर्जा कार्यक्षमतेमध्ये सर्वोत्तम कामगिरी करणारं पहिल्या क्रमांकाचं राज्य एक ठरलं आहे. केंद्रीय ऊर्जा मंत्रालयानं आज राज्य ऊर्जा कार्यक्षमता

निर्देशांक २०२४ जारी केला. या निर्देशांकानुसार ऊर्जा कार्यक्षमतेमध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्राच्या पाठोपाठ आंध्र प्रदेश, आसाम आणि त्रिपुरा या राज्यांचा समावेश आहे. या निर्देशांकाअंतर्गत इमारत बांधणी, उद्योगक्षेत्र, नगरपालिका सेवा, वाहतूक, कृषी, वीज वितरण कंपन्या या प्रमुख क्षेत्रांसह आंतर क्षेत्रीय उपक्रमांमधल्या कामगिरीचं एकूण ६६ मानकांच्या आधारे मुल्यमापन केलं जातं.

हा निर्देशांक राज्य पातळीवर माहितीसाठ्याची देखरेख, ऊर्जा वापर व्यवस्थापनाचा मागोवा, सर्वोत्तम पद्धतींना प्रोत्साहन तसंच ऊर्जा कार्यक्षमतेल्या स्पर्धात्मक सुधारणांच्या प्रक्रियेत महत्वाचा ठरला आहे.

<><><><>

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांना आज सकाळी मुंबईत आझाद मैदानावर उपोषण सुरु केलं. त्यांच्या समर्थनार्थ राज्यभरातून आलेले आंदोलक मुंबईत फोर्ट, CSMT, चर्चगेट, पूर्व द्रुतगती महामार्ग, पूर्व मुक्त महामार्ग अशा ठिकाणी जमा झाल्यानं सर्वत्र गर्दी झाली असून वाहतूक कोंडी झाली आहे. मराठा आंदोलनामुळं पोलिसांनी ठिकठिकाणी वाहतुकीवर निर्बंध घातले आहेत. सकाळी उपोषण सुरू केल्यानंतर लगेचच मनोज जरांगे यांनी मराठा समाजातल्या नागरिकांना गर्दी कमी करण्याचं तसंच निर्धारित ठिकाणी वाहनं लावण्याचं आवाहन केलं. आंदोलकांनी पोलिसांना सहकार्य करावं, मुंबईकरांना कुठलाही त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी, असं आवाहन जरांगे यांनी केलं आहे. तरीदेखील आझाद मैदान आणि आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणात आंदोलक उपस्थित आहेत.

दरम्यान दिवसभरात विविध राजकीय पक्षांचे खासदार, आमदार आणि इतर नेत्यांनी जरांगे यांची भेट घेऊन आंदोलनाला पाठिंबा दर्शवला.

<><><><>

दरम्यान, जरांगे यांना आझाद मैदानावर आंदोलन करण्यासाठी मुंबई पोलिसांनी आणखी एक दिवस वाढवून दिला आहे. आधी त्यांना केवळ आज संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आंदोलनाची परवानगी देण्यात आली होती. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर कोणालाही नाराज न करता, चर्चेतून, संवैधानिक पद्धतीनं आणि न्यायालयात टिकेल, असं आरक्षण देऊ, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले.

- **- - होल्ड - फडनवीस बाइट १-- -**

सरकारनं या प्रकरणी मंत्रीमंडळ उपसमिती स्थापन केली आहे. ती समिती सरकार आणि आंदोलकांशी चर्चा करुन प्रस्ताव सादर करेल. तोपर्यंत संपूर्ण आंदोलनाला गालबोट लागेल अशाप्रकारे कुणी वागू नये, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

**<><><><>**

मराठा समाजासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी महायुती सरकारनं केल्या आणि यापुढेही करत राहू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. त्याचवेळी इतर समाजाचं आरक्षण काढून मराठा समाजाला देता येणार नाही, हे त्यांनी स्पष्ट केलं. तर, भाजपा आणि देवेंद्र फडनवीस यांच्याकडे मराठा आरक्षण देण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती नसल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

**<><><><>**

जालना जिल्ह्यात राजुर-टेंभुर्णी मार्गावर गाडेगव्हाण फाटा इथं आज एक प्रवासी कार विहिरीत पडल्यामुळं ५ प्रवाशांचा बुडून मृत्यू झाला. तत्पूर्वी या कारनं रस्त्यालगत मॉर्निंग वॉक करत असलेल्या एका स्थानिक रहिवाशाला जोरदार धडक दिली. त्यात तो गंभीर जखमी झाला असून त्याला रुग्णालयात दाखल केलं आहे.

पहाटेच्या वेळी रस्त्यालगत मॉर्निंग वॉक करणाऱ्या स्थानिक रहिवाशांना वाचवण्याच्या प्रयत्न करताना चालकाचा वाहनावरचा ताबा सुटल्यानं ही दुर्घटना झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी पावसाचा जोर कायम आहे.

नांदेड जिल्ह्यातल्या एकूण ९३ मंडळापैकी ६९ मंडळात अतिवृष्टी झाली. मुसळधार पावसामुळे सर्व नदी, नाल्यांना पूर आला आहे. नांदेड शहरात अनेक सखल भागात पाणी शिरलं. जिल्ह्यातल्या गोदावरी, मानार, मांजरा, लेंडी, या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातले ३ तलाव फुटून शेत पिकांचं नुकसान झालं. पावसामुळे झालेल्या विविध दुर्घटनांमध्ये ३ जणांचा मृत्यू झाला तर एक जण बेपत्ता आहे. तेलंगणातही मुसळधार पाऊस सुरु असल्यानं पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी निजामसागर, पोचमपाड या धरणामधलं बॅक वॉटर आणि विसर्गामुळे बिलोली, देगलूर,

धर्माबाद तसंच मुखेड तालुक्यात पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. आतापर्यत एकूण ५ हजारहून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे.

परभणीत गेले दोन दिवस सुरू असलेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं. अनेक ठिकाणचे रेल्वे ट्रॅक पाण्याखाली गेल्यानं नांदेड विभागातल्या गाड्या पर्यायी मार्गानं वळवाव्या लागल्या.

हिंगोली जिल्ह्यात काल रात्रीपासून पाण्याची आवाक वाढली असल्यानं सिद्धेश्वर धरणाच्या १४ दरवाज्यांतून ११ हजार ९४६ क्युसेक्स पाणी पूर्णा नदीपात्रात सोडलं जात आहे, इसापूर धरणाच्या ७ दरवाजांमधून पैनगंगा नदीत ११ हजार ६३८ क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळं पूर्णा आणि पैनगंगा या दोन्ही नद्यांना पूर आला आहे. जिल्ह्यात वसमत आणि कळमनुरी तालुक्यातही अतिवृष्टी झाली. कळमनुरी तालुक्यात उमा नदीला पूर आल्यानं तिथली वाहतूक ठप्प झाली होती.

वाशीम जिल्ह्याच्या मानोरा आणि कारंजा तालुक्यात पावसाची संततधार सुरू असल्यानं अरुणावती नदीला पूर येऊन काही काळ वाहतूक ठप्प झाली. जिल्ह्यातला कारंजा-मानोरा मार्गही काही काळ बंद ठेवावा लागला.

कोल्हापुरातही राधानगरी धरणातून पाण्याचा विसर्ग आज वाढवला, आज दुपारी धरणाचा अणखीन एक स्वयंचलित दरवाजा पुन्हा उघडला.

मुंबई, ठाणे आणि पालघरसह आसपासच्या क्षेत्रात आज दुपारनंतर पावसाचा जोर वाढला.

**<><><><>**

जागतिक शांतता आणि स्थैर्यासाठी भारत आणि जपानमधील भागीदारी आवश्यक आहे, यावर दोन्ही देशांचं एकमत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज टोकियो इथं जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांच्यासोबत १५ व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत भाग घेतला. त्यानंतर ते संयुक्त वार्ताहर परिषदेत बोलत होते. मजबूत लोकशाही असलेले देश एक चांगल्या जगाच्या जडणघडणीच्या निर्मितीत नैसर्गिक भागीदार असतात असं ते म्हणाले. या परिषदेच्या निमित्तानं झालेली चर्चा फलदायी आणि हेतू साध्य करणारी ठरल्याचं त्यांनी सांगितलं. जपानचं तंत्रज्ञान आणि भारताची प्रतिभा ही विजेती ठरणारी युती असल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

उपराष्ट्रपतीपदाच्या आगामी निवडणुकीसाठी पाठिंबा देण्याची विनंती करणारी पत्रं सर्व खासदारांना लिहिणार असल्याची माहिती इंडिया आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांनी आज दिली. मुंबईत ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. आपण कोणत्याही राजकीय पक्षाचे सदस्य नसून कोणत्याही पक्षात जाण्याचा आपला विचारही नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. एका वेगळ्या मार्गाने देशाची सेवा करायच्या उद्देशाने उपराष्ट्रपतीपदाच्या शर्यतीत उतरल्याचं रेड्डी यांनी सांगितलं. मुंबईत त्यांनी आज ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह इतर नेत्यांची भेट घेतली.

**<><><><>**

राज्यातही आजच्या राष्ट्रीय क्रीडा दिवसानिमित्तानं विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

आंतराष्ट्रीय, आशियायी तसंच राष्ट्रीय पातळीवर क्रीडा स्पर्धेत विशेष कामगिरी करणाऱ्या राज्यातल्या खेळाडुंना रोख पारितोषिकांसाठी २८ कोटी ६८ लाखांच्या तरतुदीला राज्य सरकारनं मान्यता दिली असून क्रीडा विभागानं काल त्याबाबतचा शासन निर्णय जारी केला.

**मुंबई उपनगर** क्रीडा आणि युवक कल्याण विभागांतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयानं मेजर ध्यानचंद सिंह यांच्या जयंतीनिमित्त वांद्रे इथं राष्ट्रीय क्रीडा दिन कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. यावेळी मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार उपस्थित होते.

**छत्रपती संभाजीनगरच्या** क्रीडा प्राधिकरणाच्या नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स इथं राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्तानं आयोजित कार्यक्रमात केंद्रीय युवक आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे सहभागी झाल्या होत्या. राज्यातलं हे उत्कृष्ट क्रीडा केंद्र म्हणून ओळखलं जात असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख खडसे यांनी केला.

**सोलापूर**च्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात, तसंच **कोल्हापूर, भंडारा, धुळे, इथं आणि बुलडाणाच्या शेगाव सिद्धिविनायक तंत्र महाविद्यालय टेक्निकल कॅम्पसमध्येही** राष्ट्रीय क्रीडा दिवसानिमित्तानं कार्यक्रमांचं आयोजन केलं होतं.

**<><><><>**

हवामान विभागानं मुंबई, ठाणे, पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाटमाथा, कोकण, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली या जिल्ह्यांना उद्यासाठी जोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या जिल्ह्यांमध्ये काही भागात मध्यम ते जोरदार पाऊस आणि वादळी वाऱ्यांसह मेघगर्जनेची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

**//<><><><>//**